| PUBLICATION NAME : | Mumbai Lakshadweep |
| --- | --- |
| EDITION : | Mumbai |
| DATE : | 08/12/23 |
| PAGE : | 6 |



# डिपार्टमेंट ऑफ एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ डिसेबिलिटीज (डीईपीडब्ल्यूडी) आणि आंत्रेप्रेन्युरशीप अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (ईडीआयआय) यांच्यात कॉर्पोरेट्ससह ३००० दिव्यांग व्यक्तींना (पीडब्ल्यूडी) रोजगाराच्या आश्वासक संधी मिळवून देण्यासाठी भागिदारी

मुंबई, दि.७ : आंत्रेप्रेन्युरशीप अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने (ईडीआयआय) डिपार्टमेंट ऑफ एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ डिसेबिलिटीज (डीईपीडब्ल्यूडी), सामाजिक कल्याण आणि सक्षमता मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकायनि कॉर्पोरेट्सच्या गोलमेज परिषदेचे आयोजन केले होते. सीएसआर उपक्रम ांअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना (डीईपीडब्ल्यूडी) खात्रीशीर रोजगार मिळवण्यासाठी मदत करण्याच्या दृष्टीने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

डॉ. विनीत राणा, जनरल मॅनेजर, नॅशनल हॅंडीकॅंड फायनान्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, डीईपीडब्ल्यूडी, भारत सरकार, श्री. जगन्नाथ साहू, अध्यक्ष, एसबीआय फाउंडेशन, श्री. राजेंद्र निंबाळकर, आयएएस, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि., मुंबई, श्री सौम्या चौधरी सीजीएम, आयडीबीआय बँक लिमिटेड, डॉ. सुनील शुक्ला, संचालक, ईडीआयआय, डॉ. रामन गुजराल, संचालक, डिपार्टमेंट ऑफ प्रोजेक्ट्स (कॉर्पोरेट) ईडीआयआय तसेच डीईपीडब्ल्यूडीचे वरिष्ठ अधिकारी, वेगवेगळ्या कॉर्पोरेट कंपन्यांचे सीएसआर लीडर्स या क्रांतीकारी परिषदेसाठी उपस्थित होते. या परिषदेत समाजाला मोठ्या प्रमाणावर संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी, दिव्यांग व्यक्तींसाठी तंत्रज्ञानावर आधारित १५०० उद्योग आणि १५०० इतर उद्योग अशा ३००० नव्या उद्योगांची स्थापना करण्याविषयी कोणती पावले उचलावी लागतील यावर चर्चा करण्यात आली. या महत्त्वाकांक्षी परिषदेत सरकार, कॉर्पोरेट्स व संस्थांच्या मदतीने दिव्यांग व्यक्तींसाठी अधिक चांगले विश्व तयार करण्याविषयी विचार मांडले गेले. शाश्वत उद्योगांची निर्मिती करून आणि पायाभूत सुविधा, दृष्टीकोन, पर्यावरण, सुरक्षा व इतर सुविधांच्या माध्यमातून त्यांचा समाजाचत पूर्णपणे समावेश करण्यासाठी सर्वोत्तम पद्धती तयार करून दिव्यांग व्यक्तींना सक्षण करण्याच्या उद्दिष्टावर या चर्चेत प्रामुख्याने भर देण्यात आला. त्याशिवाय या चर्चेमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी कामाच्या ठिकाणी सर्वसमावेशक वातावरण तयार करणे, वेगवेगळ्या व्यावसायिक कल्पनांची निर्मिती करून त्याद्वारे दिव्यांग व्यक्तींना आपला व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत करणे, प्रकल्पांची शाश्वत विकास उद्दिष्टांशी सांगड घालणे आणि महत्वाचे म्हणजे, दिव्यांग व्यक्तींना कमी पैशांचे रोजगार देण्याच्या सामाजिक आणि व्यावसायिक मानसिकतेमध्ये बदल करणे अशा विचारांवरही यावेळेस भरीव चर्चा झाली.




सहभागी कॉर्पोरेट्सनी ही चर्चा आणि निष्कर्षांवर आधारित सहकार्याचे पहिले काही मुद्दे निश्चित केले. दिव्यांग व्यक्तींसाठी ३००० उद्योगांची निर्मिती करण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी पुढीलप्रमाणे काही उपक्रम ठरवण्यात आले - समाजाच्या मुख्य प्रवाहात दिव्यांग व्यक्तींना समाविष्ट करण्यासाठी जागरूकता अभियान, किशोरवयीन दिव्यांग व्यक्तींसाठी आवश्यक जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण, दिव्यांग व्यक्तींसाठी व्यावसायिक संधींचे स्रोत तयार करणे, दिव्यांग व्यक्तींमध्ये भावनिक जागरूकता तयार करण्यासाठी कार्यशाळा (सेन्सिटायझेशन वर्कशॉप्स), कर्जासाठी पाठिंबा, दिव्यांग व्यक्तींच्या व्यवसायाला पाठिंबा देणारा औद्योगिक विकास व कौन्सेलिंग उपक्रम आणि बेरोजगार दिव्यांग व्यक्तींना त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मायक्रो स्किलप्रेन्युअरशीप डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (एमएसडीपी) इत्यादी आर्थिक विकास व अर्थार्जनाच्या शाश्वत संधी पुरवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.'